**( इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )**

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या** अधिकारिते मधील

फ़ौजदारी अपीलीय अधिकारिता

**फौजदारी रिट याचिका क्रमांक ३७८९/२०२२**

गौसिया फिरोज खान

वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी

राहणार : जुना सर्वेक्षण क्रमांक ११४०, नवीन सर्वेक्षण क्रमांक ११४६, भवानी पेठ, आयना मशीद समोर, एडी कॅम्प चौक, पुणे, महाराष्ट्र

.......याचिकाकर्ता

विरुद्ध

1. पोलिस आयुक्त, पुणे शहर
2. तुरुंग अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती तुरुंग, नागूर
3. सचिव,
   सल्लागार मंडळ (एमपीडीए),
   मंत्रालय, मुंबई

.... उत्तरवादी

कु. मिस्बाह सोलकर, याचिकाकर्त्याचे वकील

कु. एम. एच. म्हात्रे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता - प्रतिवादी – राज्यसाठी

न्यायमंच: न्या. ए. एस. गडकरी आणि प्रकाश डी. नाईक,

निकाल राखून ठेवल्याचा दिनांक : ८ फेब्रुवारी, २०२३.

निकाल जाहिर केल्याचा दिनांक : २० फेब्रुवारी, २०२३.

न्यायनिर्णय - (न्या. प्रकाश डी. नाईक द्वारे)

१ याचिकाकर्त्यांने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत, पोलीस आयुक्त, पुणे शहर (उत्तरवादी क्र. १ यांनी दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजी महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषद्द्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणा-या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि वस्तूंचा काळा बाजार करणा-या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ (संक्षिप्ततेसाठी एम.पी.डी.ए. कायदा) या कायदयाच्या कलम ३(२) अन्वये पारित केलेल्या आदेशास, ज्यामध्ये त्यांनी श्री. फिरोज उर्फ बबली मकबूल खान यांना सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी कोणत्याही प्रकारची बाधा निर्माण करण्यापासून रोखण्याकरिता त्यांना स्थानबद्ध करण्याचे निर्देष दिले होते, या आदेशास आव्हानित करुन, ही याचिका दाखल केली. याचिकाकर्ता हया सदर स्थानबद्ध केलेल्या व्यक्ती यांच्या पत्नी आहेत.

स््थानबद्ध केलेल्या व्यक्तीवर स्थानबद्धतेच्या आदेशासह, स्थानबद्धतेची कारणे आणि कागदपत्रे ज्यांच्या आधारावर स्थानबद्धता प्राधिकरणाने आक्षेपित स्थानबद्धता आदेश पारित केला, ती देखील बजावण्यात आली.

२ याचिकाकर्ता तर्फे विद्वान वकिल कु. मिस्बाह सोलकर यांनी सादर केले की, स्थानबद्धता आदेश हा गुन्हा नोंद क्र. १५६/२०२२ यावर आधारित आहे जो खडक पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंड विधानाच्या (संक्षिप्ततेसाठी आय.पी.सी.) कलम १४३, १४७, १४८, १४९, ४२७, ५०४, ५०६ आणि भारतीय हत्यार कायदयाच्या कलम ४ (२५) अन्वये नोंदविलेला आहे आणि गु. नों. क्र. ११६/२०२२ जो समर्थ पोलीस ठाणे मध्ये भारतीय दंड विधानाच्या कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये आणि दंड विधी दुरुस्ती अधिनियम च्या कलम ३ आणि ७ अन्वये नोंदविलेला आहे. स्थानबद्ध प्राधिकरणाने देखील आक्षेपित स्थानबद्धता आदेश पारित करण्यासाठी साक्षीदार अ आणि ब यांच्या कक्षांतर्गत नोंदविलेल्या जबाबावर भिस्त ठेवली.पुढे त्यांनी असे सादर केले की, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीस गु.नों.क्र. १५९/२०२२ मध्ये दिनांक ३१ मे २०२२ रोजी आणि गु.नों.क्र. ११६/२०२२ मध्ये दिनांक ७ जुलै २०२२ रोजी अटक करण्यात आली. गु.नों.क्र. १५६/२०२२ मध्ये अटक केलेनंतर, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीस संबंधित न्यायालयासमोर हजर करण्यात आले आणि

त्यास दिनांक १४ जून २०२२ पर्यंत न्यायालयीन कोठडी रिमांड मंजूर करण्यात आला. स्थानबद्धतेच्या कारणांमध्ये असे नमूद करण्यात आले होते की, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीने दिनांक २ जून २०२२ रोजी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, पुणे, यांचेसमोर जामिन मिळणेकामी अर्ज केला होता, जो मंजूर करण्यात आला होता आणि त्यानुसार त्याची मुक्तता करण्यात आली होती. गु.नों.क्र. ११६/२०२२ मध्ये, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीस दिनांक ८ जुलै २०२२ रोजी संबंधित न्यायालयासमोर हजर करण्यात आले आणि त्यास दिनांक २२ जुलै २०२२ पर्यंत न्यायालयीन कोठडी रिमांड सुनविण्यात आली.त्यांने दिनांक ८ जुलै २०२२ रोजी जामीन मिळणेकामी अर्ज केला होता आणि सदरचा अर्ज प्रलंबित होता. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपपत्र दाखल करण्यात आले. आक्षेपित स्थानबद्धता आदेश हा दिनांक ६ सप्टेंबर २०२२ रोजी पारित करणेत आला. स्थानबद्धता आदेश जारी करणेच्या तारखेस स्थानबद्ध व्यक्ती ही कोठडीत होती. स्थानबद्धता प्राधिकारी यांना ही बाब माहित होती की, स्थानबद्ध केलेली व्यक्ती ही अगोदर पासूनच न्यायालयीन कोठडीत आहे. परंतु, स्थानबद्धता प्राधिकरणाने, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीची जामिनावर सुटका होण्याची शक्यता उघड केलेली नाही. स्थानबद्धता प्राधिकरणाने कोणतीही संयुक्तिक बाब आणि तथ्ये उघड केलेली नाहीत. ज्यामुळे स्थानबद्धता आदेश पारित करण्याची गरज भासली. वैध स्थानबद्धता आदेश स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीच्या विरोधात तेव्हाच पारित केला जाऊ शकतो जेव्हा स्थानबद्धता प्राधिकरणाला व्यक्तीगतरित्या खात्री असते की, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीस संयुक्तिक बाबींच्या आधारे जामीनावर सोडण्याची वास्तविक आणि निश्चितप्राय शक्यता आहे आणि तो कोठडीत असताना स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीविरुध्द वैध स्थानबद्धता आदेश पारित करणे अत्यावश्यक आहे. स्थानबद्धता प्राधिकरणाचे, स्थानबद्ध केलेली व्यक्ती जामिनावर सुटण्याची निश्चितप्राय शक्यता आहे याबाबत स्थानबद्धतेच्या कारणांमध्ये खात्री व्यक्त करणे हे कर्तव्य आहे, जे या प्रकरणामध्ये केलेले नाही. स्थानबद्ध प्राधिकरणाचे समाधान हे कुठल्याही संयुक्तिक बाबींवर आधारित नसल्यामुळे ते निष्फळ ठरले आहे.स्थानबद्धता प्राधिकरणाने उत्तरासाठी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात याचा परामर्श घेतलेला नाही.या न्यायालयाने फौजदारी रिट याचिका

क्रमांक २९६७/२०२२ जयेश दामोदर कोळी वि. पोलीस आयुक्त व इतर या प्रकरणात दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजी दिलेल्या निर्णयावर भरवसा ठेवला आहे.

३ विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी सादर केले की, स्थानबद्धता प्राधिकरणास ही बाब माहित होती की, स्थानबद्धता आदेश जारी करण्याच्या तारखेस, स्थानबद्ध केलेली व्यक्ती ही कोठडीत होती. स्थानबद्धतेच्या कारणांमध्ये असे नमूद केले आहे की, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीने गु.नों.क्र. ११६/२०२२ मध्ये जामिन मिळणेकामी अर्ज केला होता आणि सदर जामिनाचा अर्ज हा मा. न्यायालयापुढे प्रलंबित होता.स्थानबद्धता कारणांच्या परिच्छेद क्र. ८ मध्ये स्थानबद्धता प्राधिकारी यांनी नमुद केले आहे की, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीचा जामिनाचा अर्ज हा निर्णयासाठी प्रलंबित आहे. हा गुन्हा मृत्यूदंडाची शिक्षा सक्तीची आहे अशा स्वरुपाचा नसल्याने सध्या या देशात अस्तित्वात असलेल्या सर्वसाधारण कायदयातंर्गत स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीचा जामीन अर्ज मंजूर केला जाऊ शकतो.त्याच्या हालचाली लक्षात घेता, स्थानबद्धता प्राधिकारीला असे वाटले की, जामिनाची सुविधा मिळाल्यानंतर आणि मुक्त व्यक्ती झाल्यावर, स्थानबद्ध केलेली व्यक्ती ही पुन्हा तश्याच प्रकारच्या कारवाया करु शकते.त्यांनी पुढे असे सादर केले की, याचिकाकर्त्याच्या विद्वान वकिलांनी उत्तरादाखल सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राबाबत विचार करण्याचा प्रश्न उद्भवत नाही कारण याचिकेत उपरोक्त कारणाचा उल्लेख करण्यात आलेला नाही. विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी याचिकाकर्ता याच्या याचिकेतील कारण क्र. (फ) ज्यामध्ये मांडलेली बाजू जसे, प्रस्तावक प्राधिकरणास माहित असून सुध्दा की, स्थानबद्ध केलेली व्यक्ती जी गु.नों.क्र. ११६/२०२२ जो समर्थ पोलीस ठाणे यांचेकडे दाखल आहे, त्यामध्ये न्यायालयीन कोठडीत आहे. तरी, प्रस्तावक प्राधिकरणाने स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीने केलेला जामिन अर्ज प्रलंबित असताना, स्थानबद्धता प्राधिकारी यांचेसमोर प्रस्ताव ठेवला फक्त ही खात्री करण्यासाठी की जरी न्यायालयाने स्थानबद्ध केलल्या व्यक्तीस जामीन मंजूर केला तरी तो तुरुंगातच राहिल आणि त्यामुळेच स्थानबद्धता आदेश यामधून दुष्ट हेतूची जाणीव होत आहे, जो रद्दबातल करुन खारीज करणे आवश्यक आहे. पुढे असे सादर केले की, याचिकाकर्त्याने दाखल केलेल्या कारणांशी संबंधित स्थानबद्धता प्राधिकारी यांनी त्यांच्या उत्तरासाठी दाखल केलेल्या

प्रतिज्ञापत्रात असे म्हटले आहे की, ती कारणे प्रस्तावक प्राधिकरणाशी संबंधित आहेत आणि म्हणुण प्रस्तावक प्राधिकरणाचे प्रतिज्ञापत्र वाचले जावे.विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तावक प्राधिकरणाने दाखल केलेल्या उत्तराकडे निर्देश केला आणि सादर केले की, कारण क्र. ६ (फ) मध्ये याचिकाकर्त्यानि जे म्हणणे मांडले आहे, त्याला उत्तरादाखल सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये असे उत्तर देण्यात आले की, प्रस्तावक प्राधिकरणाने स्थानबद्ध व्यक्तीचा जामिनाबाबतचा अर्ज प्रलंबित असताना, तो तुरुंगातच खितपत राहिल हे घडवून आणण्यासाठी स्थानबद्धता प्राधिकरणासमोर अर्ज सादर केला ही बाब नाकारण्यात आली आहे.हे देखील नाकारण्यात आले की, स्थानबद्धता आदेशामध्ये दुष्ट हेतूची जाणीव होत आहे.असेही म्हणणे मांडण्यात आले की, सदर गुन्हयाचा तपास चालू असताना दिनांक ७ जूलै, २०२२ रोजी सदर स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीस अटक करण्यात आली होती. स्थानबद्धता आदेश जारी करण्याच्या तारखेस स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीने दाखल केलेला जामिन अर्ज हा प्रलंबित होता.त्यामुळे याचिकाकर्त्याच्या म्हणण्यात काहीच तथ्य नाही.

४ याचिकाकर्त्याच्या विद्वान वकिलांनी सादर केलेले निवेदन हे आव्हानाच्या कारणास्तव याचिकेमध्ये स्पष्टपणे मांडले गेले नाही असे गृहित धरुन, याचिकेत मांडलेली कारणे हे सूचित करतात की, स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव हा स्थानबद्धता प्राधिकारी यांचेसमोर, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीने दाखल केलेला जामिन अर्ज प्रलंबित असताना, सादर केला होता.जरी स्थानबद्धता प्राधिकारी यांनी उत्तरासाठी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात उपरोक्त नमूद कारणासाठी उत्तर न देण्यासाठी काही समर्थन जरी असले तरी, अभिलेखावर असलेले कागदपत्र, स्थानबद्धतेची कारणे आणि स्थानबद्धतेच्या कारणांमध्ये परावर्तित होत असलेले व्यक्तीनिष्ठ समाधान हे दर्शवते की, स्थानबद्धता आदेश जारी करण्याच्या तारखेस, स्थानबद्ध केलेली व्यक्ती ही गु.नों.क्र. ११६/२०२२ च्या संदर्भात कोठडीत होती आणि त्याने दिनांक ८ जुलै, २०२२ रोजी जामिन मिळणेकामी अर्ज दाखल केला होता आणि तो प्रलंबित होता.हे लक्षात घेणे उचित आहे की, स्थानबद्धता आदेश हा दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजी जारी करण्यात आला होता व त्यामुळे स्थानबद्धता आदेश जारी होईपर्यंत दोन महिन्यांच्या कालावधीसाठी, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीची जामिनावर सुटका झाली नाही.

५ रमेश यादव वि. जिल्हा दंडाधिकारी, इतह आणि इतर (१९८५) ४ एस.सी.सी. २३२ या प्रकरणामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, स्थानबद्धता प्राधिकरणास अशी भीती होती की, जर स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीस जामिनावर सोडले तर तो पुन्हा त्या भागामध्ये कारवाया करेल आणि म्हणुणच स्थानबद्धता आदेश जारी करण्यात आला होता. जर स्थानबद्धता प्राधिकरणाची भीती खरी असेल तर जामिन अर्जाला विरोध करावा लागेल आणि जर जामिन अर्ज मंजूर झाला असेल तर वरिष्ठ न्यायालयात त्या आदेशाविरोधात आव्हान करावे लागेल.केवळ स्थानबद्ध केलेला आरोपी हा न्यायाधीन बंदी आहे आणि म्हणूण त्यास जामिन मिळावा या आधारावर राष्ट्रीय सुरक्षा कायदयातंर्गत सर्वसाधारपणे स्थानबद्धता आदेश पारित केला जाऊ नये.

६ कमरुनिस्सा वि. भारत सरकार आणि इतर आणि त्याच्याशी संबंधित याचिकांमध्ये (१९९१) १ एस.सी.सी १२८, या प्रकरणामध्ये सुध्दा असे निरीक्षण नोंदविले की, कोठडीत असलेल्या व्यक्तीच्या प्रकरणातदेखील वैध रीतीने स्थानबद्धता आदेश पारित केला जाऊ शकतो १. जर आदेश पारित करणा-या प्राधिका-यास ही बाब माहित असेल की तो प्रत्यक्षात कोठडीत आहे ; २. जर त्याच्याकडे त्याच्यासमोर ठेवलेल्या विश्वासार्ह बाबींच्या आधारावर त्याला हे मानन्यास संयुक्तिक कारण आहे की, त्याची जामिनावर सुटका होण्याची शक्यता आहे आणि अशाप्रकारे सुटका झाल्यावर तो अपायकारक अशा हालचालींमध्ये सामील होईल ; ३. जर त्याला असे करण्यापासून रोखण्यासाठी त्याला ताब्यात घेणे आवश्यक वाटत असल्यास.

७ बिनोद सिंग वि. जिल्हा दंडाधिकारी, धनबाद, बिहार आणि इतर (१९८६) ४ एस.सी.सी. ४१६ मध्ये असा निर्णय दिला होता की, सामाजिक संरक्षणसाठी एखादया व्यक्तीला प्रतिबंधात्मक स्थानबद्ध करण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तूस्थितीची जाणीव असणे गरजेचे आहे.जर एखादी व्यक्ती कोठडीत आहे आणि तो जामिनावर सुटण्याची निश्चितप्राय शक्यता नाही तर प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेचा अधिकार वापरला जाऊ नये. स्थानबद्ध केलेली व्यक्ती ही तुरुंगात होती. असा कोणताही संकेत नव्हता की, आदेशाची बजावणी होण्यापूर्वी स्थानबद्धता प्राधिकारी यांनी ही बाब किंवा हा प्रश्न व्यवस्थितपणे आणि गांभीर्याने विचारात घेतला नव्हता की, स्थानबद्ध केलेल्या

व्यक्तीची सुटका होऊ शकते किंवा त्याच्या सुटकेची शक्यता आहे.अधिका-यांनी केलेले साधे विधान हे कोणत्याही आधाराविना केलेले आहे.जर विचार करण्यासाठी काही संयुक्तिक बाबी असत्या की, स्थानबद्ध केलेली व्यक्ती कदाचित सुटू शकते तर हे उघड व्हायला हवे होते.

८ ए. शांथी (एस एम टी) वि. टी.एन. सरकार आणि इतर (२००६) ९ एस.सी.सी. ७११ या प्रकरणात असे नोंदविले की, स्थानबद्धता प्राधिकरणापुढे अशी कोणतीही संयुक्तिक बाब नव्हती की, ज्याच्या आधारे स्थानबद्धता प्राधिकरणाला याची खात्री पटली असती की, स्थानबद्ध केलेली व्यक्ती जामिनावर सुटण्याची शक्यता आहे. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या बाबींवरुन अनुमान काढावे लागते.अशा बाबींच्या अभावामुळे स्थानबद्धता प्राधिका-याने केलेले साधे विधान हे स्थानबद्धता आदेश कायम ठेवण्यासाठी पुरेसे नाही.

९ फौजदारी रिट याचिका क्रमांक ३९७७/२०१७ श्रीमती. सुमन सुधाकर जाधव वि. पोलीस आयुक्त, ठाणे आणि इतर या प्रकरणामध्ये प्रस्तुत न्यायालयाच्या दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीच्या आदेशामध्ये याचा ऊहापोह केला आहे की, स्थानबद्ध केलेली व्यक्ती ही आधीपासूनच कोठडीत आहे आणि त्यामुळे स्थानबद्धता आदेश जारी करण्याची आवष्यकता नव्हती.स्थानबद्धता प्राधिकरण या निष्कर्षाप्रत आले की, स्थानबद्ध केलेली व्यक्ती ही संबंधित भागातील हिंसात्मक आचरण करणारी आणि दहशतवादी स्वरुपाच्या वर्तणुकीची होती आणि विविध गुन्हेगारी हालचालींमध्ये गुंतलेली होती. त्याला अटक करण्यात आली आणि कोठडी रिमांड मध्ये पाठविण्यात आले.त्याने जामिनासाठी अर्ज केला जो मा. न्यायालयापुढे प्रलंबित होता.स्थानबद्धता प्राधिकरणाने असे सादर केले होते की, स्थानबद्धता प्राधिकरणाला ही गोष्ट माहित होती की, स्थानबद्ध केलेली व्यक्ती ही कोठडीत होती आणि त्याचा जामिनाचा अर्ज प्रलंबित होता.या प्रकरणाच्या तथ्यात्मक पैलूंची छानणी केल्यानंतर या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले की, स्थानबद्धता प्राधिकरणाला हे सिध्द करण्यात ढळढळीत अपयश आले आहे की, प्राधिकरणासमोर अशा विश्वासार्ह बाबी होत्या ज्यांच्या आधारे या गोष्टीवर विश्वास ठेवला जाऊ शकत होता की स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीची जामिनावर सुटण्याची शक्यता आहे.जरी स्थानबद्धता प्राधिकरणाने ही भिती उपस्थित

केली होती की, जर स्थानबद्ध केलेली व्यक्ती जामिनावर सुटली तर ती अशाच प्रकारच्या कारवायांमध्ये सहभागी होऊ शकेल ही शक्यता आणि तो जामीनावर सुटण्याची संभाव्यता त्या धास्तीस अग्रेसर ठरत नाही.असेही निरीक्षण नोंदविण्यात आले की, ज्या आदेशाच्या समर्थनार्थ आवश्यक कारणे नमूद केलेली नाहीत, त्या आदेशाचे प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्टीकरण देता येणार नाही.ज्यावर आधारित स्थानबद्धता आदेश हा कायम करता आला असता, असे समर्थन नोंदविण्यास स्थानबद्धता प्राधिकारी अयशस्वी ठरले.

१०. स्थानबद्ध करणा-या प्राधिका-याचे व्यक्तीनिष्ठ समाधानाकरिता नोंद करत आहे की, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीने जामिनासाठी अर्ज केला आहे आणि तो अर्ज प्रलंबित आहे आणि भविष्यात त्याला जामीन मंजूर केला जाऊ शकतो. स्थानबद्धता प्राधिकरणास ही बाब माहित होती की, स्थानबद्ध केलेली व्यक्ती ही कोठडीत होती.स्थानबद्धता आदेश जारी करण्यासाठी हे पुरेसे नाही.स्थानबद्धता प्राधिकरणासमोर ठेवलेला विश्वासार्ह बाबींच्या आधारे त्यांच्याकडे विश्वास ठेवण्यासाठी कारण हवे होते की, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीची जामिनावर सुटका होण्याची वास्वतिक शक्यता आहे आणि जर अशा प्रकारे सुटका झाल्यास तो घातक अशा कारवाया करेल आणि त्याला असे करण्यापासून रोखण्यासाठी त्याला स्थानबद्ध करणे आवष्यक आहे. अशा निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी स्थानबद्धता प्राधिका-याने त्याच्यासमोर ठेवलेली कोणतेही विष्वासार्ह बाब प्रतिबिंबीत करत नाही.हे उघडपणे दिसून येत नाही की, अशी कोणतीही संयुक्तिक बाब होती ज्याच्या आधारे या निष्कर्षापर्यंत पोहोचू शकत होतो की, स्थानबद्ध केलेली व्यक्ती कदाचित जामिनावर सुटू शकते.अशी कोणतीही संयुक्तिक बाब स्थानबद्धता प्राधिकारी समोर नव्हती ज्याच्या आधारे त्यांचे समाधान झाल होत की, स्थानबद्ध केलेली व्यक्ती कदाचित जामिनावर सुटू शकते.अभिलेखावर असलेल्या कागदपत्रांच्या आधारे अषाप्रकारचा निष्कर्ष काढू शकत नाही.स्थानबद्धता प्राधिकारी हे कोणतेही समाधानकारक समर्थन नोंदविण्यास अपयशी ठरले आहे की, प्राधिका-यांसमोर विश्वासार्ह कागदपत्रे होती ज्याच्या आधारे, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीची जामिनावर सुटका होण्याची शक्यता आहे, यावर विश्वास ठेवण्याचे कारण होते.

११  उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता, आक्षेपित स्थानबद्धता आदेश कायम करता येणार नाही आणि तो रद्दबातल करुन खारीज करण्यायोग्य आहे आणि म्हणुण खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. फौजदारी रिट याचिका क्रमांक ३७८९/२०२२ ही मान्य करण्यात येत आहे.

२. विधीनिर्णय मंजूर करण्यात येत आहे.

३. उत्तरवादी क्र. १ यांनी दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजी पारित केलेला स्थानबद्धता आदेश क्र. जा.नं/गुन्हा पीसीबी/डीईटी/खान/२८३/२०२२ हा रद्दबातल करुन खारीज करणेत येत आहे.

४. याचिकाकर्ता/ स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीची अन्य कोणत्याही प्रकरणात जरुरी नसल्यास तुरुंगातून ताबडतोब मुक्तता करण्यात यावी.

१२. सर्व संबंधितांनी या कोर्टाचा आधिप्रमाणित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी.

[न्या. प्रकाश डी. नाईक]    [न्या. ए. एस. गडकरी]

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x–x–x–x